|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/परीक्षा अर्ज वेळापत्रक/मुदत वाढ /2478/2022 दिनांक 17.10.2022

प्रति,

1) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांचे मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक

2) मा.संचालक/विभागप्रमुख,
विद्यापीठातील सर्व शैक्षणिक प्रशाळा व विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय:- माहे नोव्हेंबर/डिसेंबर,2022 व जानेवारी,2023 मध्ये होणा-या परीक्षांकरिता परीक्षा अर्ज सादर करण्याची मुदत वाढविणेबाबत.

संदर्भ:-1) जा.क्र.कबचौउमवि/7-अ/परीक्षा/2337/2022 दि.03/10/2022. परिपत्रक क्र.36/2022
2) जा.क्र.कबचौउमवि/7-अ/परीक्षा/2337/2022 दि.03/10/2022 परिपत्रक क्र.37/2022
3) जा.क्र.कबचौउमवि/7-अ/परीक्षा अर्ज वेळापत्रक/शुध्दीपत्रक/2416/2022, दिनांक 12.10.2022

महोदय/महोदया,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवविज्ञान, आंतर-विद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या माहे नोव्हेंबर,डिसेंबर 2022 व जानेवारी, 2023 मध्ये होणाऱ्या विविध परीक्षांचे परीक्षा अर्ज सादर करण्यासाठीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संदर्भ क्र.1व 2 अन्वये निर्गमित करण्यांत आले असून, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आले आहे. त्यात काही अभ्यासक्रमाच्या परीक्षा अर्ज सादर करण्यासाठी खालील प्रमाणे मुदत देण्यात आलेली होती.

| विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | रु. 50/- विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | विलंब शुल्क विरहित परीक्षाअर्ज Online Inward करण्याची अंतिम तारीख (सर्व महाविद्यालयांसाठी) | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (महाविद्यालयांसाठी) | विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (महाविद्यालयांसाठी) |
|---|---|---|---|---|
| 15.10.2022 | 20.10.2022 | 17.10.2022 | i) 18.10.2022<br>ii) 19.10.2022<br>iii) 20.10.2022 | 31.10.2022 |

तथापि, काही महाविद्यालये व विद्यार्थी यांच्याकडून परीक्षा अर्ज सादर करण्याकरिता मुदत वाढविण्यासाठी मागणी अर्ज / पत्र प्राप्त झालेले आहेत. ज्या अभ्यासक्रमांना वरील प्रमाणे परीक्षा अर्ज सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली होती, अशा अभ्यासक्रमांना परीक्षा अर्ज सादर करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार मुदत वाढ देण्यात येत आहे. या अभ्यासक्रमांना रु. 50/- विलंब शुल्कासहीत परीक्षा अर्ज भरण्याची सुविधा वगळण्यात आलेली आहे. मुदत वाढीच्या सुधारीत तारखेनंतर सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना 10 दिवसांपर्यंत रु.150/- अती विलंब शुल्क व त्यापुढे रु.150 + प्रती दिवस रु.100/- याप्रमाणे विलंब शुल्क आकारुन लेखी परीक्षा सुरु होण्याच्या 10 दिवस आधी पर्यंत परीक्षा अर्ज स्वीकारण्यात येतील. शेवटच्या 10 दिवसांमध्ये कोणत्याही कारणास्तव परीक्षा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**परीक्षा अर्ज स्वीकारण्याच्या सुधारीत तारखा**

| विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम तारीख (विद्यार्थ्यांसाठी) | विलंब शुल्क विरहित परीक्षाअर्ज Online Inward करण्याची अंतिम तारीख (सर्व महाविद्यालयांसाठी) | विलंब शुल्क विरहित परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयास सादर करण्याची अंतिम तारीख (महाविद्यालयांसाठी) |
|---|---|---|
| **28.10.2022** | **31.10.2022** | **i) 01.11.2022 (जळगाव जिल्हा)**<br>**ii) 02.11.2022 (धुळे जिल्हा )**<br>**iii) 03.11.2022 (नंदुरबार जिल्हा)** |

वरील तारखांच्या परीक्षा अर्ज सादर करण्याच्या अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या अर्ज सादर करण्याकरिता मुदत वाढ देण्यात आलेली नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

वरील प्रमाणे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये झालेला बदल सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
Sd/-XXX
(प्रा.दिपक शरदराव दलाल)
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) कबचौउमविशी सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे मा. प्राचार्य २) कबचौउमविशी संलग्नीत सर्व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक
३) कबचौउमवितील सर्व शैक्षणिक विभागाचे मा. विभाग प्रमुख ४) परीक्षा व मूल्यमापन मंडळातील सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव
५) संगणक केंद्र प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव ६) समन्वयक, ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगाव

**प्रतिलिपी माहितीसाठी :**

१) मा.प्र-कुलगुरु, कबचौउमवि, जळगाव २) मा. कुलसचिव, कबचौउमवि, जळगाव
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव ४) स्विय सहायक, मा. कुलगुरूंचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
५) स्थळ प्रत.